नियमीत फौजदारी खटला क्रमांक ६४१/२०२०
शासन विरुध्द अशोक प्रपाली
निशाणी क्रमांक ०९

अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक १ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करतो की

माझे नावः- मोहम्मद रफिक जलालुद्दीन शेख
वयः- ३० वर्षे धंदाः- चालक
रा. मरिअम्मा नगर वरळी, मुंबई.

सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. सदर घटना दिनांक १०/१०/२०१९ रोजी घडली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सदर घटना ही १२ तारखेला नेहरु प्लॅनेटेरीअम जवळ घडली होती. वरळी सी फेस डेअरी कॉर्टरस येथे माझ्या पत्नीचे माहेर म्हणजेच माझी सासुरवाडी आहे. त्यादिवशी रात्री मी माझ्या सासुरवाडी येथुन माझ्या भाच्याच्या वाढदिवसासाठी माझ्या आईच्या घरी मरिअम्मा नगर येथे जात होतो. मी नेहरु प्लॅनेटेरीअमच्या गेट जवळ आलो तेव्हा अशोक, त्याचे आई वडिल व इतर दोघेजण तिकडुन येत होते. दुरुनच त्यांनी मला पाहिले, त्यानंतर अशोक याने पळत येवुन माझ्या कानावर फाईट मारली त्यामुळे मी पडलो होतो. त्यानंतर अशोकने मला लाथांनी मारहाण केली. आरोपीचा भाउ दिलीप हा माझा मित्र तिथे आला व तो आरोपीला समजवत होता व तो आरोपीला घेवुन गेला. त्यानंतर मी घरी गेलो. सदर घटना रात्री १.०० ते १.३० वाजताच्या सुमारास घडली होती. मी घरी गेल्यानंतर घरच्यांना त्याबाबत सांगितले. माझा कान दुखत होता. त्यानंतर सकाळी मी पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी मला पोदार रुग्णालयात पाठवले. त्यानंतर मी पोलीसांत घटनेबाबत तक्रार दिली. सदर तक्रारीतील मजकुर वाचुन दाखवला तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा लावला आहे. ती तक्रार निशाणी क्रमांक १० वर आहे.

२. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन, तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण..

<u>उलट तपास आरोपीकरिता श्री. उमेशकुमार वकील यांच्याकडून</u>

३. आरोपी व मी एकाच भागात राहतो. मी सातवीपर्यंत शिकलो आहे. माझा जन्म मुंबईत झाला. तक्रारीतील मजकुर वाचुन मी त्यावर अंगठा केला किंवा कसे हे मला आठवत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी वाचुन अंगठा केला होता. माझ्या भाच्याचा वाढदिवस ११ तारखेला होता व मी रात्री १२.०० नंतर तिकडे पोहोचलो होतो. मी त्यावेळी पायी जात होतो. माझ्या सासुरवाडी पासुन माझ्या घरी जाण्यासाठी दहा ते पंधरा मिनीटे लागतात. घरुन मी किती वाजता निघालो हे मला आठवत नाही. त्यावेळी मी एकटाच जात होतो. अशोक हा मुख्य रस्त्यावर गेटजवळच होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याभागात सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. मी कधीतरी दारु पितो.

**४.** मी सरतपासात सांगितलेला घटनाक्रमच पोलीसांना सांगितला होता या व्यतिरिक्त काहीही सांगितले नव्हते. मला एक मोठा भाउ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी दारु पिलो होतो व मला माझ्या भावानेच मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी दारुच्या अंमलाखाली असताना रस्त्यावर शिवीगाळ करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व त्याचे आईवडिल घटनास्थळावर आलेच नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कानावर फाईट मारली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, फाईट मारल्यामुळे मी खाली पडलो व त्यानंतर आरोपीने मला लाथांनी मारहाण केली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीची मोटार सायकल घेवुन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या गाडीचे नुकसान केले व त्याबाबतचे पैसे मागितल्याने आरोपीसोबत मी भांडण केले.

**५.** पोलीसांनी दवाखान्यात पाठवले तेव्हा माझी आई माझ्यासोबत होती. दवाखान्यात सकाळी ८.०० वाजता गेलो असु. पोलीस ठाण्यात ५.०० ते ६.०० वाजताच्या दरम्यान गेलो होतो. पोलीस ठाण्यातुन मी अगोदर घरी गेलो व सकाळी दवाखान्यात गेलो. दवाखान्यात पंधरा वीस मिनीटे लागली असतील. मला कानावर मारहाण झाल्याचे मी डॉक्टरांना सांगितले होते. आरोपीचे नाव मी डॉक्टरांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, रात्री मी दारुच्या नशेत असल्याने पोलीस ठाण्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नशेत असल्याने पोलीसांनी मला पोलीस ठाण्यातुन पाठवुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः गाडीवरुन पडलो होतो, आरोपीच्या गाडीवरुन पडलो व त्याचे नुकसान केल्याचे त्याने पैसे मागितल्याने मी खोटी तक्रार दाखल केली. पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज मला दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देतो.

उलट तपास पुर्ण**..**
फेर तपास काही नाही**..**
दिनांक १३/१०/२०२३

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

sd/-
महानगर न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्रमांक ६२ दादर,मुंबई